*श्री व्यंकटेश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची योगासन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज येथे नुकत्याच झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय योगासन स्पर्धेत श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेत कु. श्रेया अनिल खोंद्रे, बी. कॉम. आयटी भाग-१ हिने मुलींच्या गटात प्रथम क्रमांक, तर शुभम दत्तात्रय चिखलकर, बी. कॉम. आयटी भाग-२ याने मुलांच्या गटात प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाचा मान उंचावला आहे. या यशामागे महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार यांचे परिश्रम व मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले की, “विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रासोबतच योग व क्रीडा क्षेत्रातही प्राविण्य मिळविणे ही अभिमानाची बाब आहे. हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.” या दोन्ही विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि क्रीडा कारकिर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.*





श्रुती खोंद्रे व शुभम चिखलीकर यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवासजी बोहरा व चेअरमन श्रीकृष्णा बोहरा, प्राचार्य डॉ. विजय माने व शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार